दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनेल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २८७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२९ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## सावधान ! अनेक राज्यांना मोठा इशारा, वातावरणात बदल होणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, नवी दिल्ली :** देशभरात वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. सध्या देशातील अनेक राज्यांमध्ये कडाक्याचं ऊन पडत आहे. पण आता वातारणात मोठे बदल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. देशातील काही राज्यांमध्ये पुढच्या काही तासांत ११० किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार आहेत. यासोबत मुसळधार पावसाचादेखील अंदाज वर्तवण्यात आला आहे. नैऋत्य मान्सून वेगाने आगेकूच करत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली आणि हरियाणा इथे २९ मे च्या दिवशी हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. इथे ८० ते १०० किमी प्रतितास विगाने वादळ येण्याची शक्यता आहे. तसेच ३० मे रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

उत्तर प्रदेशमध्येदेखील अशीच परिस्थिती असण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात उद्या २९ मे रोजी ६० ते ८० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. इथे २८ आणि २९ तारखेला गारपीटची शक्यता आहे. तसेच २९ मे रोजी पश्चिम यूपीत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

बिहारमध्ये २८ आणि २९ हे दोन दिवस अतिमुसळधार पावसाचे असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. झारखंडला २८ मे ते १ जून या काळात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय धुळीचे वादळ देखील येण्याची शक्यता आहे.

पश्चिम बंगालमध्ये २८ आणि २९ मे रोजी पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या इथे ५० ते ७० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांना देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तराखंडसह जम्मू आणि काश्मीरमध्ये वादळ येणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

मध्य प्रदेशातही वादळ आणि मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात ३० मे पर्यंत मुसळधार पावसाचा आणि गारपीटचा अंदाज वर्तवण्यात आल आहे. छत्तीगड राज्यात २९ आणि ३० मे या दोन दिवसांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात सध्या तरी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला नाही. काही ठिकाणी तुरळक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## ठाण्यात अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त, ६ जणांना अटक

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.२८, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली २७ मे २०२६ रोजी एक मोठी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अनेक अन्न व्यावसायिकांवर कडक कारवाई करण्यात आली आहे.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी विविध अन्न आस्थापनांची तपासणी करून तब्बल ७ लाख ३० हजार रुपयांपेक्षा जास्त किंमतीचा संशयास्पद साठा जप्त केला आहे. यामध्ये १,४९,७२४ रुपयांचे खाद्यतेल, ९३,८३० रुपयांचे फरसाण, २,०६,८०० रुपयांचे तूप, ८,१९० रुपयांचे हक्का नुडल्स, १७,१०० रुपयांची ताडी, ५४,०९६ रुपयांचे शरबत आणि १,९७,६४० रुपये किंमतीच्या ड्रिंकाचा (गम अरेबिक) समावेश आहे. याशिवाय, याच दिवशी प्रतिबंधित अन्न पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली असून, त्यांच्याकडून ४,५३,३४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अन्न व औषध प्रशासनाने सर्व अन्न व्यावसायिकांना अन्न सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आणि स्वच्छता राखण्याचे कडक आवाहन केले आहे. नागरिकांना अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत काही तक्रार असल्यास त्यांनी प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा किंवा वागळे इस्टेट, ठाणे येथील सह आयुक्त कार्यालयात लेखी तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्याच्या रक्षणासाठी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अशी कडक कारवाई यापुढेही नियमितपणे सुरू राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## मच्छीमारांनो सावधान... १ जूनपासून समुद्रात मासेमारीला बंदी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, ठाणे :** ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील मच्छीमारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. समुद्रातील मासळीच्या साठ्याचे जतन करण्यासाठी आणि पावसाळ्यातील वादळी हवामानापासून मच्छीमारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी शासनाने यंदा १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत पावसाळी मासेमारीवर अधिकृत बंदी जाहीर केली आहे. ठाणे-पालघर जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) दिनेश पाटील यांनी या संदर्भातील अधिकृत माहिती दिली आहे.



### नियमांचे उल्लंघन केल्यास होणार कडक कारवाई

या दोन महिन्यांच्या कालावधीत समुद्रातील माशांचा प्रजोत्पादन काळ असतो, त्यामुळे या बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेला मोठा वाव मिळून समुद्रातील मासळीचा साठा वाढण्यास मदत होते. मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या आदेशानुसार, ही पावसाळी मासेमारी बंदी सर्व प्रकारच्या यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांना पूर्णपणे लागू राहील. मात्र, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचलित नौकांना या बंदीतून सवलत देण्यात आली आहे. सध्या समुद्रात गेलेल्या सर्व यांत्रिक नौकांनी ३१ मे २०२६ पूर्वीच आपापल्या बंदरांमध्ये परतणे बंधनकारक करण्यात आले असून, १ जून किंवा त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बंदरांवर मासे उतरवण्यास परवानगी दिली जाणार नाही. तसेच, राज्याच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंतच्या क्षेत्राबाहेर खोल समुद्रात जाणाऱ्या नौकांना केंद्र शासनाचे धोरण व मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

या शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन सर्व मच्छीमार सहकारी संस्थांना करण्यात आले आहे. जर बंदीच्या काळात कोणतीही यांत्रिक नौका बेकायदेशीरपणे मासेमारी करताना आढळली, तर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमांतर्गत ती नौका, त्यावरील उपसाधने आणि पकडलेली मासळी जप्त करून संबंधित मालकावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. इतकेच नव्हे तर, बंदीच्या काळात समुद्रात जाऊन अपघात झाल्यास अशा नौकेला शासनाकडून कोणतीही आर्थिक नुकसान भरपाई मिळणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व नौकामालकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात आले आहे.

## नीट परीक्षा निकालाच्या धास्तीने १८ वर्षीय युवकाची आत्महत्या

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, परभणी :** नीट परीक्षेच्या निकालाच्या तणावातून एका १८ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना गंगाखेड येथील गोदावरी तांडा येथे घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रफुल्ल मोहन राठोड (वय १८, रा. गोदावरी तांडा,) हा विद्यार्थी शिक्षणासाठी नांदेड येथे राहत होता. त्याने नीट परीक्षेची तयारी केली होती. मात्र, परीक्षेच्या निकालाबाबत तो काही दिवसांपासून चिंतेत होता. निकाल लागल्यानंतर तो मानसिक तणावाखाली असल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

दरम्यान, २७ मे रोजी रात्री सर्व कुटुंबीय झोपेत असताना प्रफुल्ल याने राहत्या घरात विषारी औषध प्राशन केले. ही बाब सकाळी उघडकीस आल्यानंतर कुटुंबीयांनी त्याला तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या तणावामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मानसिक आधार देण्याची गरज आहे.

## शेतकऱ्यांना रोज ३० लीटर डिझेल देण्याचे फर्मान अवैध विक्री, साठेबाजी करणाऱ्यांवर होणार कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात एचसीपीएल, आयओसीएल, बीपीसीएल, नायरा, जिओ या कंपन्यांचा पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, तसेच त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा सुरु आहे. परंतू समाज माध्यमावरील अफवांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. परिणामी पेट्रोल पंपावर अनावश्यक गर्दी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. सध्या खरीप हंगाम सुरु असल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी डिझेलची आवश्यकता भासत आहे. त्यामुळे त्यांची ओळख पटवून दररोज जास्तीत जास्त ३० लिटर डिझेलचा पुरवठा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी पेट्रोल पंपचालकांना दिले आहेत.




याबाबत त्यांनी बुधवारी (दि. २७) आदेश निर्गमित केले. दोन दिवसापूर्वीच जिल्हाधिकारी पंत यांनी शहरातील पेट्रोल पंपावर अचानक भेट देऊन साठा रजिस्टरची तपासणी व ग्राहकांसोबत संवाद साधून अडचण जाणून घेतली होती. याबाबत जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून सर्व संबंधित यंत्रणांना अलर्ट राहण्याचे निर्देश दिले आहे. जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलची साठेबाजी किंवा काळाबाजार होणार नाही. अतिरिक्त दराने पेट्रोल व डिझेलची विक्री होणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी शेतकऱ्यांना त्यांचे ओळखपत्र, सातबारा, फार्मर आयडी, मोबाईल क्रमांक, गाडीचे आर. सी. बुक तपासून दर दिवशी जास्तीत जास्त ३० लिटर डिझेलचा पुरवठा करावा. पेट्रोल पंप परिसरात सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यरत ठेवावी व तपासणी वेळी फुटेज उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

विक्री करण्यात येणाऱ्या डिझेलची नोंद ठेवण्यात यावी. तसेच तपासणी पथकास नोंद रजिस्टर उपलब्ध करून देयावे. पेट्रोल पंपावर होणारी गर्दी आणि संभाव्य वाद टाळण्यासाठी स्थानिक पोलिस प्रशासनाने पंपाच्या परिसरात नियमित गस्त ठेवावी. या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित पेट्रोल पंप चालक/ मालक/ व्यवस्थापक यांची राहील, याची नोंद घेयावी, असे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात नमुद आहे.


रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांनासुध्दा प्राधान्याने इंधन पुरवठा करण्यात यावा. सर्व तहसीलदारांनी पथक स्थापन करुन आपल्या तालुक्यातील पेट्रोलपंपाची तपासणी करावी व प्रत्येक आठवड्याला जिल्हा प्रशासनाकडे अहवाल सादर करावा. प्रत्येक पेट्रोल पंपचालकाने आपल्या पंपावर उपलब्ध असलेला शिल्लक साठा, त्या दिवशी प्राप्त साठा व मागणी केलेला साठा, याची माहिती दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील. नागरिकांनी गरजेपेक्षा जास्त इंधन भरुन साठा करु नये. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असा फलकसुध्दा पंपाच्या दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे.

**शेतकऱ्यांनो, येथे करा संपर्क**

कोणत्याही प्रकारच्या तक्रारी असल्यास शेतकऱ्यांनी ०७१७२-२५२२७२ या क्रमांकावर संपर्क साधावा. हा आदेश तत्काळ प्रभावाने ३० जूनपर्यंत लागू राहील. आदेशाचे उल्लंघन केल्यास जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ व पेट्रोलियम नियम २००२ नुसार कारवाई करण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## विसापुरातील तरुणाचा उष्माघाताने मृत्यू

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२८, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील तरुण भद्रावती तालुक्यात पावना येथे घरगुती कामासाठी २५ मे रोजी गेला होता. दरम्यान तो एका पानटपरीवर जवळ उभा असताना डोक्याच्या भारावर पडला. त्याला तातडीने चंद्रपूर येथील एका खासगी दवाखान्यात उपचारार्थ दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. चंद्रपूर जिल्ह्यात तापमाने उच्चांक गाठला असून त्याचा मृत्यू उष्माघाताने झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. राहूल विठ्ठल दानव ( ३२) रा. साईबाबा वॉर्ड विसापूर असे मृतक तरुणाचे नाव आहे. त्याच्या पार्थिवावर गुरुवार ( दि. २८ ) मे रोजी दुपारी १२ वाजता विसापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले. त्याच्या पश्चात आई,भाऊ, वहिनी व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्याच्या अकाली मृत्यूने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

राहूल दानव घरगुती कामासाठी भद्रावती तालुक्यात पावना या गावी गेला होता. वडिलोपार्जित शेतीचे कामकाज आटोपून तो विसापूर येथे परत येणार होता. मात्र ,काळ त्याची वाट पाहत होता. दुपारच्या वेळेत तो गावातील एका पानटपरीवर जवळ उभा होता. नेमक्या त्याच वेळी त्याला भोवळ आली.भोवळ येऊन तो डोक्याच्या भारावर पडला. यामुळे डोक्याला इजा झाली, असावी म्हणून त्याला तातडीने चंद्रपूर येथील खासगी दवाखान्यात भरती करण्यात आले. डॉक्टरांनी त्याचेवर उपचार करून शस्त्रक्रिया केली. मात्र डॉक्टरांचे शर्तीचे प्रयत्न निष्फळ ठरले. उपचारादरम्यान राहूलने मृत्यू ला कवटाळले. आईचा आधार असलेल्या मुलाने अखेरचा श्वास घेतला. यामुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. उष्माघाताने तरुणाचा बळी घेतला असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.




## वाहतूक साक्षरतेत खोडा

भारतात दर वर्षी साधारण पावणेदोन लाख लोक रस्ते अपघातांत मृत्युमुखी पडतात. जगभराचा हा आकडा दहा-बारा लाखांवर आहे. वाहने आणि रस्त्यांशी संबंधित वाढत्या अपघातांची दाहकता इतकी अधिक असताना, कोणी स्वत: पदरमोड करून या प्रश्नावर जनजागृती करीत असेल, लोकांना वाहतूक शिस्तीचे प्रशिक्षण देत असेल तर अशांचा गौरव करायला हवा; परंतु, 'ट्रॅफिक एज्युकेशन पार्क' या नाशिकमधील – देशातील एकमेवाद्वितीय प्रकल्पाबाबत नेमके उलट घडते आहे.

नावात 'पार्क' शब्द असला तरी ते काही उद्यान नव्हे. 'नाशिक फर्स्ट' या उद्योजकांच्या संस्थेने समाजभान राखून चालवलेले ते पथदर्शी प्रशिक्षण केंद्र आहे, जे केवळ राज्यच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी आदर्शवत ठरले आहे. परंतु, केवळ अहंकारापोटी निवडक राजकीय मंडळींनी हा प्रकल्प बंद पाडण्याचे ठरविलेले दिसते. उद्योजकांची देणगी व काही कंपन्यांच्या 'सीएसआर' फंडातून तेरा वर्षांपूर्वी या प्रकल्पाची उभारणी झाली. या प्रकल्पातून आजवर सर्वसामान्य आबालवृद्ध आणि वाहनचालक अशा सुमारे चार लाख लोकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आता मात्र हा प्रकल्प कसा गुंडाळला जाईल, याकडेच लक्ष दिले जात आहे. केंद्र सरकार, सर्वोच्च न्यायालय, राज्य सरकार आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी (आरटीओ) गौरविलेल्या या प्रकल्पाचा अपमृत्यू ओढवला आहे. महत्त्वाचे म्हणजे, राजकारण्यांसह नाशिक महापालिकाही या पापात वाटेकरी ठरली आहे.

'ट्रॅफिक पार्क'मध्ये स्थानिकांना प्रवेश दिला जात नाही, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून मानसन्मान मिळत नाही, सकाळी फेरफटका मारण्यास उद्यान नाही आदी तक्रारी काही नगरसेवकांनी केल्या. त्यापोटी महापालिकेकडून या प्रकल्पाच्या कराराच्या नूतनीकरणाची टाळाटाळ सुरू आहे. याबाबत नोटिसा धाडल्या गेल्या आहेत. नियमांचे दाखले देऊन वाढीव रेडीरेकनरने लाखो रुपये शुल्क आकारणी करण्यात आली आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आली आहे. हे लोक प्रकल्पातून कधी एकदाचे बाहेर पडतात आणि अडीच-तीन एकरांचा हा भूखंड कधी हाती येतो, यासाठी खटाटोप सुरू आहे. एका बाजूला सिंहस्थाच्या नावाने कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करून विकासकामे केली जात असल्याच्या बाता मारायच्या आणि दुसरीकडे जबाबदार नागरिकांची पिढी घडविणारे शाश्वत प्रशिक्षण केंद्र धुळीस मिळविण्याचे कारस्थान आखायचे, हा विरोधाभासच. दुखावलेल्या 'नाशिक फर्स्ट'च्या संचालकांनीही 'आम्हाला आता महापालिकेची जागाच नको' अशी ताठर भूमिका घेतल्याने तिढा वाढला आहे. परिणामी, या 'ट्रॅफिक पार्क'ला लवकरच टाळे लागू शकते. एवढे सगळे घडत असूनही नाशिककर मात्र गप्प आहेत. मूठभर पर्यावरणप्रेमी सोडता, संवेदनशील विषयांवर नागरिक खरोखर व्यक्त होतात काय, हाही अलीकडचा संशोधनाचा विषय! इतकी वर्षे येथील चांगले प्रकल्प इतरत्र पळवले गेले म्हणून सत्ताधाऱ्यांच्या नावाने बोटे मोडायची आणि आता डोळ्यांदेखत याच काही लोकांच्या अहंकार व स्वार्थापोटी चांगल्या योजनेचा खून होत असताना, 'आम्हाला त्याचे काय' अशी सोयीस्कर भूमिका घ्यायची, ही विसंगतीच. विकासाचे गोडवे गाणाऱ्या भाजपच्या केंद्र-राज्य सरकारने लक्ष घालून समाजाची वास्तव गरज असलेले आणि विकासाचे खरे वाहक असलेले हे मॉडेल वाचविण्यासाठी आपल्या पुढारी व नगरसेवकांना आवरावे, या प्रकल्पासाठी जे काही करता येईल ते करावे, एवढीच अपेक्षा. बाकी राजकारण आणि अहमहमिकेसाठी इतर विषयांची कोठे कमतरता आहे?

– संपत थेटे

# मनुष्याचे मूलभूत कर्तव्य

महात्मा फुले यांनी म्हटले आहे, सृष्टीच्या कार्यकारणभावाचा अर्थ समजून घेऊन त्या सृष्टीचा किंवा निसर्गशक्तीचा मनुष्याच्या गरजा भागवण्यासाठी उपयोग करणे, हा मनुष्याचा मूलभूत अधिकार व कर्तव्य होय. थोडक्यात सांगायचे झाल्यास, जगण्यासाठी आणि उपभोगासाठी आवश्यक वस्तू निर्माण करणे किंवा मिळवणे हे मनुष्याचे पहिले कर्तव्य आहे. महात्मा फुले यांची एकूण मांडणी विवेकपूर्ण आणि वास्तववादी वाटते.

माणूस हा मूलतः इच्छा, लालसा आणि अपेक्षांनी भरलेला प्राणी आहे. मनावर नियंत्रण ठेवणे प्रत्येकालाच सहज शक्य होत नाही. अनासक्ती प्राप्त करण्याचे दोन परस्परविरोधी मार्ग मानले जातात. पहिला मार्ग आध्यात्मिक आहे. कोणत्याही गोष्टीची तृष्णा बाळगू नये, विषयसुखात मन रमवू नये आणि त्यागी वृत्ती विकसित करत अनासक्ती गाठावी ‐ हा मार्ग भावनिकदृष्ट्या कणखर लोकांना अधिक सहज साध्य होऊ शकतो. दुसरा मार्ग म्हणजे विषयसुखांचा अनुभव घेत-घेत अनासक्ती प्राप्त करणे. ओशो यांसारख्या विचारवंतांनी या मार्गाचे समर्थन केले आहे. म ाणसाने आपल्या गरजा वाढवल्या, हे जरी खरे असले तरी तो निसर्गात उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचाच उपयोग करून त्या पूर्ण करतो. म्हणूनच मानवी जीवनातील उपभोगवाद हा एक महत्त्वाचा गाभा ठरतो.

माणसाचे मूलभूत कर्तव्य म्हणजे निसर्गाचा योग्य उपभोग घेणे आणि स्वतःच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करणे. मात्र त्यापुढे जाऊन, पुढील पिढ्यांसाठी निसर्गसंपत्ती जपून ठेवणे हे त्याहून श्रेष्ठ कर्तव्य आहे.

आज, २९ मे हा जागतिक भूक दिन आहे. जगातील प्रत्येकाला पुरेल एवढे ‐ किंबहुना त्यापेक्षाही अधिक ‐ अन्नधान्य पृथ्वीवर निर्माण होते. परंतु त्याचे वितरण असमान असल्यामुळे अनेक लोक उपाशी किंवा अर्धपोटी राहतात. भारतामध्ये रेशनसारखी व्यवस्था वर्षभरात सुमारे ८३ कोटी लोकांना दरमहा पाच किलो मोफत अन्नधान्य पुरवते. माणसाचे आणखी एक मूलभूत कर्तव्य म्हणजे जगभर अस्तित्वात असलेली व्यवस्था टिकवून ठेवणे आणि त्यात सर्व जीवम ात्रांना अनुकूल असे बदल घडवत राहणे. आज जग महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. सध्याची युद्धे अन्न, पाणी, वस्त्र किंवा निवाऱ्यासाठी होत नाहीत. मागील दोन शतकांतील बहुतेक युद्धे ही वर्चस्व गाजवण्यासाठी, परस्परांतील अविश्वासाम ुळे किंवा स्वतःच्या देशातील जनतेला अधिक सुखसुविधा मिळवून देण्यासाठी झाली आहेत. काही युद्धे हेकेखोर राजकारण्यांच्या अतार्किक भूमिकांमुळेही उद्भवतात.म्हणूनच जगभर शांतता नांदण्यासाठी हातभार लावणे हे देखील मनुष्याचे मूलभूत कर्तव्य आहे. जगा आणि जगू द्या या छोट्याशा वाक्यात संपूर्ण जीवसृष्टीचे कल्याण दडलेले आहे.

आजच्या घडीला मनुष्याची काही महत्त्वाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील ‐

१) पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.
२) नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करणे.
३) विवेकबुद्धीचा सातत्याने उपयोग करणे.
४) व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धैर्य ठेवणे.
५) इतरांना मदत करण्यासाठी तत्पर राहणे.
६) अन्न व पाण्याअभावी कोणाचाही बळी जाणार नाही, यासाठी प्रयत्न करणे.
७) युद्धजन्य परिस्थिती निर्माण होणार नाही, यासाठी हातभार लावणे.
८) शिक्षण घेणाऱ्यांना मदत करणे आणि शिक्षणव्यवस्था योग्य प्रकारे कार्यरत आहे का, यावर लक्ष ठेवणे.
९) सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बिघडेल असे कोणतेही कृत्य न करणे.
१०) समाजस्वास्थ्य उत्तम राहील असे वर्तन ठेवणे; कोणाच्याही भावना दुखावतील किंवा द्वेष निर्माण होईल असे भाष्य टाळणे.
११) कायद्याचे अधिराज्य टिकून राहण्यासाठी सहकार्य करणे.
१२) जागतिक मानवी हक्क जाहीरनाम्यातील हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जागरूक राहणे.

एकूणच, पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीचे कल्याण साधण्यासाठी प्रयत्न करणे हेच मनुष्याचे खरे मूलभूत कर्तव्य आहे.कारण शेवटी मनुष्य महान त्याच्या संपत्तीने होत नाही; तर तो निसर्ग, समाज आणि मानवतेशी किती प्रामाणिक राहतो यावर ठरते.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# बंगाली बाबांवर कारवाई केव्हा ?



वशीकरण, जादूटोणा, करणी, प्रेमातील अपयश, विवाह न होणे, असाध्य रोग, नोकरी व्यवसायातील अपयश, गृहक्लेश, पती-पत्नींमधील भांडणे, मूल न होणे, घटस्फोट, विदेश यात्रा यांसारख्या समस्यांवर हमखास उपाय काढून सर्व समस्यांपासून मुक्ती देण्याचा दावा करणाऱ्या बंगाली बाबांच्या जाहिराती प्रवासात कुठेनाकुठे हमखास वाचायला मि ळतात.

लोकल तसेच एक्सप्रेस गाड्यांमध्ये अधिकृतरीत्या जाहिरातींसाठी लाखो रुपये मोजावे लागत असताना हे बंगाली बाबा मात्र आपली जाहिरात सर्वत्र फुकटात करत असतात. अनेक एसटी बसमध्ये आसनाशेजारी या जाहिरातींचे स्टिकर्स लावलेले पाहायला मिळतात. महिलांच्या राखीव आसनाशेजारी बसच्या पत्र्यांवर तर या जाहिराती हमखास पाहायला मिळतात. महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा राज्यात पारित होऊन आज १३ वर्षे उलटली तरी या जाहिराती मात्र थांबलेल्या नाहीत. हिंदू धम र्तील प्रथा परंपरांना सर्रास अंधश्रद्धेचे लेबल लावू पाहणारी अंधश्रद्धा निर्मूलन समिती हा कायदा पारित झाल्यानंतर या बंगाली बाबांच्या विरोधात ठोस काही करताना दिसत नाही. रेल्वे प्रशासन या बंगाली बाबांच्या अनधिकृत जाहिरातीच्या विरोधात कधीतरी जोरदार मोहीम उघडते मात्र दरम्यानच्या काळात या बाबांची फुकटात जाहिरात होत असते. अनेक बंगाली बाबांच्या जाहिरातींमध्ये स्त्रियांसाठी विशेष सवलतींचे प्रयोजन केलेले असते. स्त्रिया भावनिक असतात त्यामुळे बंगाली बाबांच्या या भूलथापांना त्या बऱ्याचदा बळी पडतात आणि आयुष्याची राखरांगोळी करून घेतात. यंदाच्या फेब्रुवारी मासात मोहम्मद नझीर अंदारी एका बंगाली बाबाला अटक करण्यात अली होती. ज्याच्याकडून १५ हजारांहून अधिक पोस्टर्स आणि स्टिकर्स जप्त करण्यात आले होते. या कारवाईच्या बातम्या त्यावेळी समस्त वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. आजमितीला असे कितीतरी बंगाली बाबा राजरोसपणे आपली दुकाने थाटून बसली आहेत त्यांच्यावर कारवाई केव्हा होणार ?

हिंदू धर्मात अध्यात्मातील मार्गदर्शकांना, साधूंना आणि संतांना 'बाबा' म्हणून आदराने संबोधण्याची प्रथा आहे. घरात पित्याला बाबा म्हणून जसा सन्मान दिला जातो तसा सन्मान अध्यात्मातील अधिकाऱ्यांना 'बाबा' संबोधून दिला जातो. सार्वजनिक वाहनांत स्टिकर्स चिकटवून फुकटात जाहिरातबाजी करणाऱ्या बंगाल्यांपैकी ९९ टक्के बंगाली हे मुसलमानच असतात तरीही त्यांना मुल्ला किंवा मौलवी म्हणून न संबोधता 'बाबा' म्हणून का संबोधले जाते हा सुद्धा एक गहन प्रश्न आहे. तथाकथित पुरोगामी आणि नास्तिक विचारांची मंडळी हिंदू धर्माला बदनाम करण्याची एकही संधी सोडत नाहीत. अशा बंगाली भोंदूंमुळे त्यांनाही आयते कोलीत मि ळते. या भोंदूंना जेव्हा पोलीस पकडतात तेव्हा वृत्तपत्रांतूनही भोंदू बाबाला अटक केल्याच्या बातम्या प्रसिद्ध केल्या जातात. ज्यामुळे समस्त भोंदू हे हिंदू धर्मातच भरले आहेत असा गैरसमज सामान्य नागरिकांचा होतो. भगवी वस्त्र परिधान करून भोळ्या भाबड्या भाविकांना लक्ष करायचे, वेगवेळ्या विधींच्या नावाखाली त्यांच्याकडून पैसे लुबाडायचे, महिलांना आपल्या जाळ्यात अडकवायचे आणि आपले इप्सित साध्य करायचे. काहीच नाहीतर प्रसिद्ध तीर्थस्थळांच्या ठिकाणी भगवी वस्त्र परिधान करून वैरागी बनून लोकांकडून भिक्षा मागायची आणि आपला चरितार्थ चालवायचा. अशा कितीतरी मुसलमानांच्या टोळ्या मध्यंतरी प्रयागराज कुंभमेळ्याच्या ठिकाणी जागरूक भाविकांनी पकडल्या. आजही राज्यातील अनेक सुप्रसिद्ध मंदिरांच्या ठिकाणी साधूंचा वेष धारण करून लोकांना लुबाडणारे अन्य धर्मीय सापडतात. अशा लपंटामुळे बदनाम होतो तो हिंदू धर्म.

सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांमध्ये जाहिरातींचे स्टिकर्स चिकटवणाऱ्या तथाकथित बंगाली बाबांच्या विरोधात रेल्वे तसेच महाराष्ट्र परिवहन विभागाने अनेकदा मोहिमा उघडून या बंगाल्यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. त्यांच्याकडून दंडवसुलीही केली आहे. तरीही जाहिरातबाजी काही थांबलेली नाही. याचा अर्थ या भोंदूंना मिळणारी शिक्षा तरी अल्प आहे किंवा प्रशासनाचे याकडे म्हणावे तसे लक्ष नाही. या भोंदूंच्या भूलथापांना बळी पडून दरवर्षी कितीतरी जण आपला म ेहनतीचा पैसा वाया घालवतात. स्त्रिया आपले सर्वस्व गमावतात. 'बाबा' बिरुद लावून हिंदू धर्माला बदनाम करणाऱ्या आणि नागरिकांच्या भावनांशी आणि धनाशी खेळणाऱ्या अशा भोंदू बंगाल्यांवर कठोर कारवाई केव्हा होणार ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## नवदाम्पत्याची गावाला अनोखी भेट...

हल्ली लग्न म्हणजे प्रचंड खर्चाची बाब झाली आहे. देखावे, प्रचंड झगमगाट, सोने चांदीचा थाट असा काहीसा साज असतो. मात्र याला अपवाद नांदेडमधील एका विवाहाने एक नवीन धडा घालून दिला आहे. नांदेड मधील कंधार तालुक्यातील बहाद्दरपुरा येथील सिद्धेश्वर पेठकर यांचा विव्हाह नुकताच २० मे रोजी पार पडला. सामाजिक भान राखत या पेठकर कुटुंबीयांनी संपूर्ण गावाची विमा पोलिसी काढली. गावातील सुमारे ३४६५ नागरिकांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे विमा कवच त्यांनी दिले. विशेष म्हणजे गावातील एकही पात्र नागरिक या पासून वंचित राहू नये या दृष्टीने पेठकर कुटुंबीयांनी नियोजन केले होते. आपल्या संस्कृतीत दान केल्याचे सांगितले जात नाही. त्य्याचा गाजावाजा केला जात नाही गावकऱ्यांचे भले व्हावे व त्यांचे आशीर्वाद पाठीशी असावेत एवढीच इच्छा.पेठकर कुटुंबियांती गावाची तब्बल ३३.६ कोटीची पोलिसी काढली ही बातमी नुकतीच वाचली. या विमा कवचामुळे सर्व गावकऱ्यांचे जीवन सुखकर होणार हाच एक आनंद पेठकर कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे आजकाल लग्नात मोठा खर्च केला जातो पण शेवटी त्याचे काय होते ? त्या ऐवजी खर्च करून त्याचा फायदा समाजाला होणार असेल तर ते केव्हाही चांगले गावातील लग्नात प्रत्येक लग्न कुटुंबीयाने दानाचा आदर्श ठेवावा. जेणेकरून त्याचा समाजाला उपयोग होईल व त्या पैशाचा खऱ्या अर्थाने उपयोग होईल.

**- शांताराम वाघ, पुणे**

# चायनिज पदार्थ... आरोग्यासाठी हानिकारकच!



भारतीयांना चायनीज गोष्टीचे पूर्वीपासूनच आकर्षण आहे. अगदी चिनी वस्तूंपासून चायनिज पदार्थांपर्यंत सर्वच गोष्टी भारतीयांना आवडतात. त्यातही चायनिज पदार्थांची तर सर्वांना चटक लागलेली आहे. बाहेर जेवायला जायचे म्हटले तर बरेच जण चायनिज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनमध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे. भारतात चायनिज पदार्थांच्या नावाखाली जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ तयार केले जातात. रस्त्याशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गडावरील चायनिज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असते त्यातही या गाड्यांवर तरुणाईच अधिक दिसते. चायनिज गाड्यांवर तरुणाईची झुंबड उडाल्याचे दिसते. ग्रुपम धील कोणा मित्राचा वाढदिवस असेल तर तो साजरा करण्यासाठी तरुणाई चायनिज गाड्यावरच जातात. हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्या मागचे मुख्य कारण आहे. मात्र हे पदार्थ स्वस्तात देण्यासाठी तेथील आचारयाना अनेक तडजोडी कराव्या लागतात. त्यात निकृष्ट प्रकारच्या पदार्थांच्या भाज्या आणि तेल वापरले जाते. चायनिज पदार्थांमध्ये अजिनिमोटो हा पदार्थ वापरला जातो. पदार्थांना चव आणण्यासाठी या पदार्थांचा वापर केला जातो. आवश्यकतेपेक्षा जास्त अजिनिमोटो हा पदार्थ वापरला गेला तर त्याचा परिणाम पचनसंस्थेवर होऊ शकतो. चायनिज पदार्थांमध्ये मोनोसोडियम ग्लुटाम ेट, शेजवान सॉस, कृत्रिम रंग, स्टार्च कॉर्न यासारखे जिन्नस वापरल्यामुळे पचन संस्था बिघडू शकते. भात बांबूचे मूळ, मशरूम, नूडल्स, चिकन, मांस अर्धवट शिजवले जातात त्यामुळे ते पचायला जड जातात चांगल्या प्रतीचा मैदा नसल्यास तो आतड्यास चिकटू शकतो. चायनिज पदार्थांमध्ये वापरला जाणारा तांदूळही पॉलिश आणि रिफाईंड असल्याने पचन संस्थेसाठी हितकारक नसतो. त्यामुळे चायनिज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारकच आहे. एखाद्यावेळी चायनिज पदार्थ खाल्लयाने ते ही चांगल्या हॉटेल किंवा रेस्टॉरंट मध्ये जाऊन तर बिघडत नाही. पण आठवड्यातून चार पाच वेळा चायनिज पदार्थ खाण्याची सवय हानिकारक ठरू शकते.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# महाबळेश्वर येथे इद उल अजहा (बकरी ईद) उत्साहात साजरी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२८, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथे ईद उल अजहा (बकरी ईद) सण मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा केला. इस्लाम धर्मानुसार प्रेषित इब्राहिम यांनी अल्लाहच्या आदेशासाठी आपल्या प्रिय पुत्राचा त्याग करण्याची तयारी दर्शवली होती. त्यांच्या श्रद्धा आणि आज्ञाधारकतेमुळे अल्लाहने त्यांच्या पुत्राऐवजी एका प्राण्याची कुर्बानी स्वीकारली. त्या स्मरणार्थ बकरी ईद साजरी केली जाते. सकाळ पासून शहरातील मशिदींमध्ये विशेष नमाज अदा करण्यात आली. नमाजनंतर एकमेकांना मिठी मारून ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

या पवित्र सणानिमित्त मुस्लिम समाजातील नागरिकांनी कुरबानीची परंपरा पार पाडत सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश दिला. तसेच गरीब व गरजू नागरिकांना मदतीचा हात देत मानवतेचे दर्शन घडविले.

महाबळेश्वर शहरात ईद निमित्त आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विविध भागांत लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी नवीन पोशाख परिधान करून सणाचा आनंद लुटला. प्रशासनाच्या वतीनेही शांततेत आणि सुरळीत वातावरणात सण पार पडावा यासाठी योग्य नियोजन करण्यात आले होते. ईद उल अजहा हा त्याग, श्रद्धा आणि ऐक्याचा संदेश देणारा सण मानला जातो.

# बोरी येथे ईद-उल-अजहा उत्साहात साजरा



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२८, बोरी (परभणी) :** बोरी ईदगाह मैदान येथे ईद-उल-अजहा निमित्त मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात सार्वजनिक नमाज अदा केली. पहाटेपासूनच मुस्लिम बांधवांची ईदगाह मैदानावर गर्दी होत होती. शांतता, बंधुता आणि सामाजिक सलोखा यांचा संदेश देत धार्मिक वातावरणात नमाज संपन्न झाली. यावेळी मकसूद मौलाना यांनी ईद-उल-अजहाचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. तर हाफेज फैसल मौलाना यांनी कुरआन पठण केले व त्यानंतर सामूहिक नमाज अदा करण्यात आली. हाफेज कलीम मौलाना हे देखील यावेळी उपस्थित होते.

मकसूद मौलाना यांनी आपल्या भाषणात समाजात ऐक्य आणि परस्पर सन्मान राखण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, आपण या देशात सर्व धर्मीयांसोबत एकोप्याने राहत आहोत. महाराष्ट्र शासनाने ज्या जनावरांच्या कत्तलीस मनाई केली आहे, त्या आदेशाचे पालन प्रत्येकाने करावे. इतर धर्मीयांच्या श्रद्धेचाही आदर राखणे ही आपली जबाबदारी आहे. समाजात शांतता व बंधुभाव कायम राहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या या वक्तव्याचे उपस्थितांनी स्वागत केले. यानंतर कुरआन पठण करून सामूहिक नमाज अदा करण्यात आली. कार्यक्रमासाठी शेख अनिस यांनी माईक व स्पीकरची व्यवस्था केली होती. तसेच इर्शाद शेख अली, अझीम अन्सारी, शेख पाशा, इम्रान पठाण,बाबा भाई, अब्दुल रहेमान भाई, कुरेशी बांधव आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी विविध राजकीय पदाधिकारी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी ईदगाह मैदानावर उपस्थिती लावली होती. यामध्ये अजय भैय्या चौधरी, गुलाबराव चौधरी, नागसेन भेरजे, शशिकांत चौधरी, पंडितराव घोलप, दासा कनकुटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. सणाच्या पार्श्वभूमीवर सहाय्यक पोलिस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शांततेत आणि सुरळीतरीत्या कार्यक्रम पार पडल्याने मुस्लिम बांधवांनी पोलिस प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

# कर्जतमध्ये साखळी उपोषण लेखी आश्वासनानंतर स्थगित

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२८, कर्जत :** कर्जत-पनवेल जुना १५ मीटर (५० फूट) डीपी रोडचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करून नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येतून दिलासा द्यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने कर्जतमध्ये टिळक चौक येथे साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. या साखळी उपोषणाची नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने तुर्तास लेखी आश्वासन देऊन उपोषण स्थगित करण्यात आले.

कर्जत शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे आयोजित करण्यात आलेल्या साखळी उपोषणास नगरपरिषद प्रशासन व नगराध्यक्षा यांनी दुपारी भेट देऊन उपोषणकर्ते ॲड .भाऊसाहेब पुंजू मोरे यांच्या समस्या व मागण्या जाणून घेण्यात आल्या. संबंधित विषयांवर सकारात्मक चर्चा करून संबंधित विभागाशी समन्वय साधण्यात आला व योग्य तो तोडगा काढत लेखी आश्वासन देऊन उपोषण यशस्वीरित्या सोडविण्यात आले.

यावेळी कर्जत नगरपरिषद नगराध्यक्षा पुष्पाताई दगडे, उपनगराध्यक्ष संतोषजी पाटील, कर्जत नगरपरिषद नगरसेवक तथा बांधकाम सभापती महेंद्र बबन चंदन पाटील, नगरसेवक बाबू पाटील, नगरसेविका मानसी कानिटकर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या उपोषणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे, शहर उपाध्यक्ष राम देशमुख आणि शहर सचिव दिलीप बुंधाटे सहभागी झाले आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखा व टेंभुर्णी पोलीसांची दमदार कामगिरी

## व्यापा-याचे २ कोटी ७० लाख रूपये हस्तगत, चार आरोपीना अटक

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२८, पंढरपूर :** चडचण जि.विजयपुर राज्य कर्नाटक येथील साडी दुकानदार बाहुबली एन.मुत्तीन यांचे मॅनेजर यातील फिर्यादी धुंडाप्पा रामान्ना खलाटे वय ३५ व्यवसाय सेल्समन रा. गोटयाळ ता.चडचण जि.विजयपुर राज्य कर्नाटक हे त्यांचे मालक यांनी त्यांना सुरत येथे पाठविणे करीता रोख रक्कम तीन कोटी रूपये दोन पोत्या मध्ये दिले होते.

यातील फिर्यादी हे ती रोख रक्कम घेवुन आयषर टेंम्पो क्रंमाक एम.एच.४५/ ए.एफ.१५१६ ही मधुन टेंम्पो मालक नागनाथ सुर्वे,सुनिल सुर्वे यांचे सोबत कॅबिनचे टपावर पैषाची दोन पोती ताडपत्री मध्ये बांधुन टेंभुर्णी ते करमाळा रोडने दिनांक ११/०५/२०२६ रोजी रात्री ०२/१५ ते ०२/२० वा दरम्यान टेंभुर्णीचे पुढील करमाळा रोडवरील बंद पडलेल्या टोलनाक्याचे पुढील बाजुस असलेल्या वळणावरून जात असताना टेंम्पोस रोडवर गजग्या रंगाचे बिगर नंबरचे स्विप्ट कार आडवी लावुन फिर्यादीचा टेम्पो थांबवून कार मधुन चार जण उतरून टेम्पोचे कॅबिन मध्ये येवुन फिर्यादीस व त्यांचे सोबतचे लोकांना चाकुचा धाक दाखवुन हाताने मारहाण करून फिर्यादीचे नरडे दाबुन कॅबिनचे वर चढुन कॅबिनचे वरील बाजुस असलेल्या ताडपत्री मध्ये ठेवलेली दोन पोत्या मधील पैसाचे रोख रक्कम ३,००,००,०००/- रूपये (तीन कोटी रूपये) चे बंडल फिर्यादीस जबरदस्ती करून पैशाची पोती खालील बाजुस जमीनीवर टाकुन ते त्यांचे स्विप्ट कार मध्ये भरून फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारण्याची धमकी देवुन चाकुचा धाक दाखवुन कार मधुन निघुन गेले होते.

त्याबाबत मॅनेजर धुंडाप्पा रामान्ना खलाटे यांनी फिर्याद दिल्याने टेंभुर्णी पोलीस ठाणे गु.र.नंबर ३४६/२०२६ भारतीय न्याय संहीता सन २०२३ चे कलम ३०९(६),१२६(२),३(५) प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्यांचा तपास मा.राहुल आत्राम, परी,सहा.पोलीस अधिक्षक तथा प्रभारी अधिकारी टेंभुर्णी पोलीस ठाणे यांचे कडे देण्यात आला होता.




सदर दाखल गुन्ह्यात मोठी रक्कम मारहाण करून चोरी गेली असल्याने मा.अतुल कुलकर्णी साहेब पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण यांनी या गंभीर गुन्ह्यात दखल घेवुन स्थानिक गुन्हे शाखे कडील संजय जगताप यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांची स्थानिक गुन्हे शाखेची दोन तपास पथक तयार करण्यात आली होती. त्याप्रमाणे गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध चालु असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या तपास पथकातील टिमला तांत्रिक विष्लेशन व गोपनिय माहीती व्दारे संषयीत आरोपी नामे अजित नामदेव सुर्वे वय २६ वर्ष रा. पांढरे वस्ती, अरण रोड, मोडनिंब याने गुन्हा केल्याची माहीती मिळाल्याने त्यास ताब्यात घेतले नंतर त्यांनी सदरचा गुन्हा हा १) सिद्धेश्वर नामदेव माने, वय ३४ वर्षे, रा. पालखीमार्ग, मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर.२) अजित नामदेव सुर्वे वय २६ वर्षे रा.पांढरेवस्ती, पालखी मार्ग, अरण रोड मोडनिंब ता.माढा ३) शुभम शहाजी पाटील वय २३ वर्षे रा.रानमळा ,मोडनिंब ता.माढा ४) विकी राजाभाऊ गिड्डे रा.गणपती मंदीराचे जवळ दत्तनगर मोडनिंब ता.माढा (अटक नाही) यांनी मिळुन केला असुन त्यामध्ये विकी गिड्डे यांचे कडील गजग्या रंगाची कार वापरल्याचे सांगितले. त्यावरून तपास पथकांतील ज्ञानदेव वाघ, सहा.पोलीस निरीक्षक यांना मिळालेल्या गोपनिय माहीती व्दारे व तांत्रिक विष्लेशनव्दारे यातील आरोपी सिद्धेश्वर नामदेव माने हा सुरत राज्य गुजरात येथे असल्याचे माहीती मिळाल्याने त्यास सुरत गुजरात येथुन ताब्यात घेतले. त्याचप्रमाणे यातील आरोपी शुभम शहाजी पाटील हा चैनई येथे गेला होता तो मोडनिंब येथे आला असल्याने तपास पथकांतील ज्ञानदेव वाघ, सहा.पोलीस निरीक्षक,यातील शुभम शहाजी पाटील रा.मोडनिंब ता.माढा हा गोलाई मोडनिंब ता.माढा येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेतले.

यातील मिळुन आलेले १) सिद्धेश्वर नामदेव माने, वय ३४ वर्षे, रा. पालखीमार्ग, मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर.२) अजित नामदेव सुर्वे वय २६ वर्षे रा.पांढरेवस्ती, पालखी मार्ग, अरण रोड मोडनिंब ता.माढा ३) शुभम शहाजी पाटील वय २३ वर्षे रा.रानमळा यांना गुन्ह्याचे कामी मा.राहुल आत्राम, परी,सहा. पोलीस अधिक्षक तथा प्रभारी अधिकारी टेंभुर्णी पोलीस ठाणे यांनी अटक करून त्यांची पोलीस कस्टडी घेण्यात आली होती. यातील आरोपी कडे पोलीस कस्टडी मध्ये तपास करीत असताना आरोपी नामे सिद्धेश्वर नामदेव माने, मोडनिंब याने त्यांचे दाजी यातील आरोपी नामे सुरज देविदास उन्हाळे वय ३३ वर्षे रा.उन्हाळे आगलावे वस्ती,जगदंबा नगर, पोखरापुर ता.मोहोळ यांनी गुन्ह्यातील चोरी केलेल्या रक्कमे पेंकी काही रक्कम दिली असल्याने व त्यांचे दाजी यांनी सोने खरेदी केले होते त्यावरून चोरीचा माल घेतला म्हणुन अटक करून पोलीस कस्टडी घेण्यात आली होती.

यातील सर्व आरोपीकडे मा.राहुल आत्राम, परी,सहा.पोलीस अधिक्षक तथा प्रभारी अधिकारी टेंभुर्णी, ज्ञानदेव वाघ, विजय गोसावी, सहा.पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा व सह तपास अधिकारी अजित मोरे, पोलीस उपनिरीक्षक यांनी केला असता यातील आरोपींनी गुन्हयांची कबुल देवुन त्यांनी गुन्ह्यातील फिर्यादीचा मौजे मोडनिंब येथुन कार मधुन पाठलाग करून कार आडवी लावुन चाकुचा धाक दाखवुन व मारहाण करून पैसाचे दोन पोती टेंम्पोचे टपावर चोरून नेले असले बाबत सांगितले. यातील आरोपी कडे पोलीस कस्टडी दरम्यान आरोपीने चोरीस गेलेल्या रक्कमेतुन खरेदी केलेले सोने, तीन ॲप्पल कंपनीचे मोबाईल खरेदी केले होते. तीन मोबाईल किंमत २,६१,९९० रूपये, सोने किंमत ५,४९,४४० रूपये व तीन अटक आरोपी कडुन २,६२,००,०००/रूपये अशी सर्व मिळुन एकुण २,७०,११,४३०/- रूपयेचा रोक रक्कम, सोने, मोबाईल असा मुदेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास हा मा.अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण , विजय कबाडे, अपर पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण, अंजना कृष्णा, सहा.पोलीस अधिक्षक , करमाळा उपविभाग यांचे मार्गदर्शनाखाली राहुल आत्राम, परी.सहा.पोलीस अधिक्षक हे तपास करीत आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपीची दिनांक २८/५/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे. सदरची कामगिरी ही राहुल आत्राम, परी.सहा.पोलीस अधिक्षक, संजय जगताप, स्थनिक गुन्हे शाखा, ज्ञानदेव वाघ, सहा.पोलीस निरीक्षक, विजय गोसावी, सहा.पोलीस निरीक्षक, अमित बाबर, पोलीस उपनिरीक्षक, खाजाभाई मुजावर, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक, नारायण गोलेकर, प्रकाश काटकर, सहा.पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार मोहन मनसावले, अन्वर आतार, प्रमोद शिंगाडे, धनराज गायकवाड, योगेष जाधव, धनाजी गाडे, सतीष बुरकुल व टेंभुर्णी पोलीस ठाणे कडील अजित मोरे, विलास रणदिवे, सहा.पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार प्रदीप पर्वते, पो.कॉ.समीर खैरे, प्रसाद अनभुले, समाधान धोत्रे, मोहन तळेकर नितीन डाकवाले व दत्तात्रय पवार इत्यादी पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

# नमन लोककला संस्थेच्या गुहागर शाखेची २०२६-२९ त्रैवार्षिक कार्यकारणी जाहीर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२८, गुहागर :** नमन लोककला संस्था कार्यक्षेत्र (अखंड भारत) संलग्न गुहागर तालुका शाखेची आगामी २०२६-२९ या त्रैवार्षिक कालावधीसाठीची नूतन कार्यकारिणी नुकतीच सर्वानुमते जाहीर करण्यात आली असून, अध्यक्षपदी वरवेली येथील जगन्नाथ शिंदे यांची तर सचिवपदी असगोली येथील प्रमोद घुमे यांची निवड करण्यात आली आहे. या संदर्भातील वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी श्री हसलाई ग्रामदेवी मंदिर वरवेली येथे अनिल रांजाणे यांच्या अध्यक्षतेखाली आणि संदीप कानसे, उदय दणदणे, अमित काताळे, संजय कळंबाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या सभेत मागील इतिवृत्तासह एप्रिल २०२१ ते मार्च २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीचा जमा-खर्च अहवाल वाचून मंजूर करण्यात आला. त्यानंतर संस्थेच्या कामकाजाला गती देण्यासाठी आणि जास्तीत जास्त सक्रिय सदस्य जोडण्याच्या उद्देशाने दिनांक २४ मे २०२६ रोजी वाडदई वरची वाडी सभागृह येथे विशेष बैठकीचे आयोजन करून नव्या कार्यकारिणीवर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले.

या जाहीर झालेल्या नूतन कार्यकारिणीमध्ये खजिनदार म्हणून शांताराम शिंदे (वरवेली), उपाध्यक्षपदी विनायक कांबळे (वाडदई) व सुरेश कदम, तर उपसचिव म्हणून सुधीर टाणकर (पालपेणे) यांची निवड झाली आहे. सदस्य म्हणून संदीप गोरीवले, संतोष घुमे, नरेश रांजाणे, जनार्दन आंबेकर, दत्ताराम चांदिवडे, यशवंत जोयशी, विठ्ठल



काताळे, शशिकांत कांबळे, सुधाकर गोणबरे, प्रवीण बारगोडे, संजय गावणंग यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच मुंबई समन्वयक म्हणून सुधाकर मास्कर, संदीप कानसे, अनिल रांजाणे, संजय कळंबाटे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून संतोष घुमे यांची नियुक्ती निश्चित रझाली आहे.

गुहागर तालुका शाखेचे नवनिर्वाचित अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी आपल्या मनोगतातून माजी कार्यकारिणीचे आभार व्यक्त केले. भविष्यातही आजी-माजी कार्यकारिणी एका विचारधारेने काम करून स्थानिक नमन कलाकारांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आगामी काळात तालुक्यातील नमन कलाकारांना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी गुहागर तालुका शाखेच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जाईल. तसेच येत्या जुलै महिन्यात तालुक्यातील जास्तीत जास्त गरजू नमन कलाकारांना शासकीय कलाकार पेन्शन प्राप्त करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान आणि सभेला तालुक्यातील नमन कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंपनीची जमीन विकुन कामगारांच्या थकबाकी द्या ; मफतलाल कामगार संघर्ष समिती आक्रमक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, कळवा (ठाणे) :** साधारण ३७ वर्षापूर्वी कळव्यातील मफतलाल इंजिनियरिंग इंडस्ट्रीयल लिमिटेड कंपनी अचानक बंद झाल्याने हजारो कामगारांवर बेरोजगारीची वेळ आली.या घटनेला आज ३७ वर्ष उलटून देखील कामगारांना त्यांची सर्व प्रकारची थकबाकी,पीएफ तथा निवृत्ती वेतनाचा न्याय मिळाला नसल्याने मफतलाल कामगार संघर्ष समितीने तीव्र संताप व्यक्त करीत कळव्यातील कंपनीच्या मालकीची १३३ एकर जमीन विकून कामगारांची सर्व थकबाकी द्यावी अशी ठाम मागणी केली आहे.



कळव्यातील मफतलाल इंजिनियरिंग इंडस्ट्रीयल लिमिटेड ही कंपनी २७ मे १९८९ रोजी कामगारांना कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता अचानकपणे बंद करण्यात आली. कंपनी मॅनेजमेंटच्या या दुर्दैवी आणि कठोर निर्णयामुळे सुमारे २२०० हून अधिक कामगार बेरोजगार झाले.त्याआधी १९८६ पासूनच कामगारांवर अन्याय अत्याचार करण्याच्या मॅनेजमेंटच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्याचा आरोप कामगारांकडून करण्यात येत आहे. तसंच त्या जुलमी काळात अनेक कामगारांना सक्तीने निवृत्त करण्यात आले.तर दीर्घ काळ सेवा बजावलेल्या कामगारांवर अतिशय अन्याय झाल्याचे कामगार समितीचे म्हणणे आहे. कामगारांच्या वतीने न्यायालयीन लढण्यात आली असून सर्वोच्च न्यायालयाने कामगारांना पुन्हा सेवेत सामाउन घेण्याचे आदेश दिले होते.मात्र या न्यायालयीन आदेशाची आजवर कोणत्याही प्रकारे अंमलबजावणी न झाल्याने हे प्रकरण आता अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे.

या दरम्यान१९९९ मध्ये कंपनी उच्च न्यायालयाच्या रिसिव्हरकडे सोपविण्यात आली.त्यानंतर कंपनीच्या जागेच्या विक्रीसाठी अनेकवेळा लिलाव प्रक्रिया देखील राबविण्यात आली.मात्र कोणताही विकासक पुढे न आल्याने काहीच निर्णय झाला नाही. सध्या ही १२३ एकर कंपनीची जागा सुमारे ११३२ कोटी रुपयांची असल्याचे मूल्यांकन समोर आले आहे.परंतु तरीही जमिनीची विक्री प्रक्रिया रखडल्याने कामगारांच्या सर्व प्रकारच्या थकबाकीची देणी आजही प्रलंबित आहेत.

या दरम्यान दोन वर्षापूर्वी म्हणजे २०२४ मध्ये डीआरटी मार्फत याच जमिनीचा लिलाव जाहीर करण्यात आला होता,पण दुर्दैवाने या लिलावाला देखील प्रतिसाद मिळाला नाही.

कामगार संघर्ष समितीचे असे म्हणणे आहे की,झोपडपट्ट्या,पार्किंग आणि इतर मालमत्तांपासून आर्थिक व्यवहार सुरू असताना कामगार मात्र आपल्या न्याय हक्कापासून वंचित आहेत.आजवर अनेक कामगारांचे निधन देखील झालेले असून उर्वरित कामगार आजही आपल्या हक्काच्या थकबाकीच्या प्रतीक्षेत आहेत. कंपनीच्या मॅनेजमेंटने आता या गरीब कामगारांचा अधिक अंत न पाहता कंपनीच्या मालकीची जमीन विकून या कामगारांची सर्व प्रकारची थकबाकी लवकरात लवकर द्यावी अशी ठाम मागणी कामगार संघर्ष समितीने केली असून आचार संहिता संपल्या नंतर या विषयावर अधिक तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा कामगार समितीने दिला आहे.

# श्री खरवली देवी मंदिराच्या रस्त्याचे होणार काँक्रिटीकरण

## नगरसेविका वेदिका पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : विनोद वास्कर**
**दि.२८, शिळफाटा (ठाणे) :** कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील, दिवा विभागाच्या शिळफाटा परिसरातील असलेल्या जागृत देवस्थान श्री खरवली देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. माजी आमदार सुभाष भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर वनमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी या कामासाठी उपवनसंरक्षक, ठाणे यांना उचित कार्यवाही करण्याचे लेखी आदेश दिले आहेत.






प्रभाग क्र. २९ मधील खरवली देवी मंदिर हे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मात्र पनवेल-मुंब्रा मुख्य रस्त्यापासून मंदिराच्या पायथ्यापर्यंत जाणारा रस्ता वनखात्याच्या अखत्यारीत असून गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत बिकट अवस्थेत आहे. खड्डे व चिखलामुळे पावसाळ्यात भाविकांसह भोलेनाथ नगर येथील रहिवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

ही समस्या सोडवण्यासाठी नगरसेविका वेदिका पाटील यांनी मंगळवारी मंत्रालयात (संदर्भ क्र. व्ही. पी. २६/४३) वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन लेखी निवेदन दिले. या निवेदनाची तात्काळ दखल घेत मंत्री नाईक यांनी संबंधित पत्रावर उपवनसंरक्षक ठाणे (प्रा) उचित कार्यवाही करिताअसा स्वहस्ताक्षरात शेरा मारून सही केली.

या भेटीप्रसंगी स्वतः माजी आमदार सुभाष भाऊ भोईर व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळाराम पाटील उपस्थित होते.

मंत्री महोदयांच्या आदेशानंतर आता उपवनसंरक्षक, ठाणे यांच्याकडून रस्त्याची पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. लवकरच या रस्त्याचे रुंदीकरण, काँक्रिटीकरण होऊन भाविक व नागरिकांची गैरसोय दूर होईल, असा विश्वास नगरसेविका वेदिका पाटील यांनी व्यक्त केला.

# करोडो रुपये खर्च करून बांधलेले गुडसूरचे प्राथमिक आरोग्य केंद्र ६ महिन्यापासून धूळखात

**अक्षराज : जयराम देमगुंडे**
**दि.२८, उदगीर (लातूर) :** उदगीर ग्रामीण जनतेला गावात दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात या उद्देशाने लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेले गुडसूर ता.( उदगीर )येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपचाराच्या प्रतीक्षेत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे मोठ्या थाटामाटात सुरू झालेल्या या केंद्राला अवघ्या काही दिवसात कुलूप लागले आहे परिणामी हे केंद्र सहा महिन्यापासून धुळखात पडले आहे प्रशासनाच्या उदासीनतेमुळे आरोग्य सेवा अक्षरश वाऱ्यावर गेली आहे

८जानेवारी २०२६ रोजी मध्ये रात्री गुडसूर येथील आरोग्य केंद्रातील सोलर बॅटरी तांत्रिक बिघाड होऊन शॉर्टसर्किट झाले त्यात केंद्राची संपूर्ण वायरिंग जळून खाक झाली आहे सहा महिने उलटून गेले तरी अद्याप वायरिंग दुरुस्तीचे काम झाले नाही परिणामी लाखो रुपये खर्चून उभारलेली ही इमारत सध्या धूळ खात पडली आहे . असलेल्या बॅटऱ्यांचे मोठमोठ्याने आवाज ऐकून येथील अपेक्षा मनोहर इंगळे व येथील कर्मचारी श्री चैतन्य स्वामी धनराज मुंडे कल्पना बोट मुकले यांनी अग्निशामक दलास फोन करून बोलून घेतले व रात्री ११.३० वाजता आग विजवण्यात आली तोपर्यंत इथे असलेल्या दहा बॅटऱ्यां इन्व्हर्टर जळून खाक झाल्याची माहिती वाढवणा पोलीस स्टेशनला दिनांक २८ /३/२०२६ रोजी देण्यात आली



या बाबतीत काय चौकशी झाली हे मात्र अद्याप पर्यंत गुलदस्त्यात आहे.

याची माहिती घेतला असता असे कळले की याचा एफ.आय.आर झाला नसल्याचे निर्दशनात आले आहे. तसेच जळीत प्रकरणाची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी अस दिनांक २६/२/२०२६ रोजी कळविण्यात आले माहिती कळवण्यास २८ दिवसाची दिरंगाई व पोलीस स्टेशनला जवळपास दोन महिन्यांनी कळविण्यात आले तसेच

घटनास्थळी जळालेल्या बॅटऱ्या किंवा इन्व्हर्टर बॉक्स ही दिसत नसल्यामुळे या जळीत प्रकरणाचे ग्रामस्थांमधून उलट सुलट चर्चेला ऊत आला आहे तरी वरिष्ठांनी याबाबतीत लक्ष घालून या प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करावी व दुषीवर कारवाई करावी अशी मागणी या भागातील ग्रामस्थ करीत आहेत.

# थोडक्यात

## खापरखेडा येथे गळफास घेऊन इसमाची आत्महत्या



**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.२८, नागपूर :** खापरखेडा (चिचोली) वार्ड क्र. १ मध्ये युवकाने घरातील बाथरूममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी दि.२८ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास उघडकीस आली. दीपक रंगारी (वय अंदाजे ४५) असे मृतकाचे नाव असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

प्राप्तमाहितीनुसार दीपक रंगारी यांची पत्नी मुलांसह मागील तीन दिवसांपासून माहेरी गेली होती. गुरुवारी सायंकाळी कुटुंबीय घरी परतल्यानंतर घराचे मुख्य दार बंद असल्याचे दिसून आले. बाहेरून कुलूप लागलेले असल्याने त्यांनी वारंवार आवाज दिला. मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संशय आल्याने शेजारी व परिसरातील नागरिकांना बोलावून दरवाजा तोडण्यात आला.

दरवाजा उघडून आत प्रवेश केल्यानंतर घरातील बाथरूममध्ये सिलिंगला गळफास घेतलेल्या अवस्थेत दीपक रंगारी आढळून आले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

मृतक दीपक रंगारी हे कोराडी वीज केंद्रात कार्यरत होते. प्रकृती अस्वस्थ राहात असल्यामुळे त्यांनी काही वर्षांपूर्वी आपल्या पत्नीला नोकरी दिल्याची माहिती समोर आली आहे. ते शांत स्वभावाचे असल्याचे परिसरातील नागरिकांकडून सांगण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुणालय, नागपूर येथे पाठविण्यात आला असून आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## भानेगावात त्यागमूर्ति माता रमाईंना स्मृतीदिनी अभिवादन



**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.२७, नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ शाखा नवीन बिना यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात त्यागमूर्ति माता रमाईंना ९१ व्या स्मृतीदिनी आदरांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरवात तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ति माता रमाईंच्या छायाचित्राला माल्यार्पण व पुष्पांजली अर्पण करून बुद्ध वंदना घेवून करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी माता रमाईने केलेल्या त्यागाच्या पायावर आंबेडकरी विचारधारेची भक्कम इमारत उभी असून त्याचे जतन, संवर्धन व सुयोग प्रचार-प्रसार समाजात करावा असे मत मांडत माता रमाईंना अभिवादन केले. आम्रपली महिला मंडळाच्या अध्यक्ष कांता बागडे यांनी रमाईची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील खंबीर भूमिका विषद केली. याप्रसंगी सल्लागार समितीचे कृष्णा वासनिक, अशोक कांबळे, किशोर चव्हाण आम्रपली व संघमित्रा महिला मंडळाच्या वच्छाला गणवीर, प्रभा लोखंडे, राधिका उके, सत्यभामा वासनिक , बेबी वासनिक, रेखा लांजेवार, मालावी नारणवरे, सुनन्दा लांजेवार, प्रिया डोंगरे, मनीषा ढोके सहित बाल-बालिका व गावातील नागरिक उपस्थित होते. संचालन मिना नरेश ढोके तर आभार मिना मेश्राम यांनी मानले.

# पाटण पंचायत समितीमध्ये कामचुकार व उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपसभापतींनी धरले धारेवर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**
**दि.२८, पाटण :** पाटण शासकीय कार्यालयाची वेळ सकाळी ९.४५ ते सायं. ६.१५ अशी निश्चित असताना पाटण पंचायत समितीमध्ये मात्र वेळेची शिस्त धाब्यावर बसवण्यात आली आहे. सोमवारी सकाळी १० ते १२ या दोन तासांत केलेल्या सप्राईज व्हिजिटमध्ये तब्बल ७४ पैकी ४८ अधिकारी-कर्मचारी गैरहजर किंवा उशिरा हजर झाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले. कार्यालयात हजेरी लावून परस्पर निघून जाणे, 'मिटिंग-दौरा'च्या नावाखाली पळवाट काढणे आणि कार्यालयात आल्यावर लगेच 'चहा'च्या नावाखाली तासन्तास बाहेर रेंगाळणे, कामचुकारपणा करणे,हा पंचायत समितीचा नित्यक्रमच बनला आहे.

उपसभापती विजय पवार यांचा 'गांधीगिरी' बाण चर्चेचा विषय ठरला. देसाई गटाची सत्ता पंचायत समितीवर स्थापन झाल्यानंतर पदाधिकाऱ्यांनी शिस्तीचा बडगा उगारला आहे. सोमवारी लोकनेते बाळासाहेब देसाई भवन, पंचायत समिती, पाटण येथे उपसभापती विजय पवार यांनी अचानक भेट दिली. यावेळी विविध विभागातील ४८ अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत हजर नसल्याचे निदर्शनास आले. यावर सभापती सविता पवार व उपसभापती विजय पवार यांनी या सर्वांचे गुलाबपुष्प देऊन अनोख्या 'गांधीगिरी' पद्धतीने स्वागत केले. आता फक्त फुल देऊन स्वागत केले आहे. शिस्तीच्या बाबत आमची पुढील दिशा लवकरच समजेल, असा सज्जड इशारा उपसभापती विजय पवार यांनी यावेळी दिला.



उपसभापती विजय पवार यांनी बोलताना, पालकमंत्री ना. देसाईंच्या 'कडक शिस्ती'च्या धोरणाला धरून पाऊल उचलले असून पालकमंत्री ना. देसाई यांचा कल नेहमीच जनतेच्या सेवेत तत्पर राहण्याकडे असतो. 'अधिकारी-कर्मचाऱ्यांनी वेळेवर कार्यालयात हजर राहून लोकांची कामे प्राधान्याने करावीत' असा त्यांचा स्पष्ट आदेश आहे. आम्ही त्यांच्याच विचारांचे पाईक आहोत. लोकांची कामे करण्यासाठी आम्ही निवडून आलो आहोत. मात्र, अधिकारी वर्गाच्या प्रचंड तक्रारी लोकांकडून ऐकायला मिळतात. कार्यालयीन वेळेत उपस्थित न राहणे, सतत बैठका, पाहणी दौरे अशा नावाखाली कार्यालये रिकामी असतात.

खेड्यापाड्यातील जनतेचे हाल होत आहेत. पंचायत समितीमध्ये खेड्यापाड्यातून सर्वसामान्य माणसे दाखले, योजनांचे अर्ज, तक्रारी घेऊन येतात. मात्र अधिकारी वेळेवर उपस्थित राहत नाहीत. 'साहेब मिटिंगला आहेत', 'दौऱ्यावर गेलेत' अशी उत्तरे ऐकून दिवसभर कार्यालयाबाहेर रेंगाळत थांबावे लागते. पालकमंत्री ना. देसाई यांच्याकडे आठवडी जनता दरबारात शेकडो तक्रारी येतात व तिथे त्याचा निपटारा होतो. परंतु शासकीय कार्यालयात अधिकारी-कर्मचारी प्रामाणिकपणे काम करत असते तर पालकमंत्री यांच्याकडे इतकी लोक आली नसती. याचा अर्थ कार्यालयात अधिकारी वर्गाची पाठ फिरलेली असते, अस म्हणणे वावगे ठरणार नाही.

कर्मचाऱ्यांचे 'चहा पुराण' तर नेहमीच पाहायला मिळत असते. स्थानिक नागरिकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, काही कर्मचारी सकाळी ११ वाजता येतात आणि लगेच 'चहाला जातो' सांगून बाहेर पडतात. हा चहा १२ वाजेपर्यंत चालतो. दुपारी जेवणानंतर पुन्हा तेच. महिला कर्मचाऱ्यांसह अनेक जण उशिरा येण्यात आघाडीवर आहेत. हजेरी रजिस्टरवर सही करून परस्पर निघून जाण्याचे प्रकारही सर्रास सुरू आहेत.

सभापती सविता पवार व उपसभापती विजय पवार यांनी पंचायत समितीचे 'शुद्धीकरण' करण्याचा चंग बांधला आहे. पालकमंत्री ना. देसाई यांच्या 'कामात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही' या कडक धोरणानुसार आता बायोमेट्रिक हजेरी, दररोज कामाचा अहवाल, विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्यांवर कारवाई असे टप्पे राबवले जाणार आहेत.

जनतेच्या पैशातून पगार घेता, मग जनतेची कामे केलीच पाहिजेत. वेळेवर या, काम करा, नाहीतर घरी बसा, असा स्पष्ट संदेश विजय पवार यांनी दिला आहे. त्यांच्या या धडक कारवाईमुळे कर्मचारी वर्गात खळबळ उडाली असून, नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# राजे छत्रपती अकॅडमी ही गुणवंतांना घडवणारी खान : खा.रवींद्र चव्हाण

**अक्षराज : अशोक लोणीकर**
**दि.२८, मुखेड (नांदेड) :** गुणवंतांचा गौरव हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम नसून तो ज्ञानेश्वर डुमणे यांच्या सामाजिक बांधिलकी आणि अथक परिश्रमाचे फलित आहे. असे प्रतिपादन खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले.

ता. मुखेड येथील राजे छत्रपती अकॅडमीतील आर्मी पोलीस व विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या गुणवंतांचा गौरव सोहळा दिनांक २४ मे २०२६ रविवार रोजीच्या या कार्यक्रमात ते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन राजे छत्रपती अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष तथा सैनिक फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर डुमणे यांनी केले.

पुढे बोलताना खासदार चव्हाण म्हणाले, ज्ञानेश्वर डुमणे गेली १० वर्षे सातत्याने गुणवत्ता असलेल्या विद्यार्थी, खेळाडू, शेतकरी आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करत आहेत. हे काम कौतुकास्पद असून ग्रामीण भागातील मुलांमध्ये गुणवत्ता आहे, फक्त त्यांना योग्य व्यासपीठ मिळायला हवे. ज्ञानेश्वर डुमणे यांनी ते व्यासपीठ उपलब्ध करून दिले. असे उपक्रम समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. तसेच डुमणे यांनी अकॅडमतील विद्यार्थ्यासहित आपत्कालीन परिस्थिती असेल महापुरुषांची जयंती, रक्तदान शिबिर यासारख्या अनेक समाज उपयोगी



उपक्रम राबवत वेळोवेळी प्रशासनाला मदत करत आहेत. तसेच ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचे यश हे केवळ त्यांच्या कुटुंबाचे नसून संपूर्ण गावाचा गौरव असतो, असे मत ठाण्याचे अप्पर जिल्हाधिकारी हरिशचंद्र पाटील चांडोळकर यांनी व्यक्त केले. गुणवंतांचा गौरव या कार्यक्रमात ते उद्घाटक म्हणून बोलत होते. ग्रामीण भागतील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय प्रशासन व्यवस्थेबरोबरच रक्षा क्षेत्रात डुमणे पाटील यांचे कार्य उल्लेखनीय व गौरववास्पद आहे असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांनी केले.

सत्कारमूर्ती म्हणून पोलीस उपनिरीक्षक गणेश जुने, माधव जुने,चंद्रकांत इंगोले, माधव जुगरे, मारोती शिरबळतळ, श्याम गोटमवाड यांच्यासहित राजे छत्रपती अकॅडमी मधुन यशस्वी झालेल्या ६५ विद्यार्थ्यांचा त्यातील ३३ पोलीस दलात तर बाकी अग्निविर, एसएससी जीडी व इतर क्षेत्रात निवड झालेल्या महिला व पुरुष जवानांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यासोबतच नवनिर्वाचित नगराध्यक्ष नगरसेवक व पत्रकारांचा ट्रॉफी व पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित जि.प.सदस्य, बळवंत पा.बेटमोगरेकर, माजी सनदी अधिकारी रामदास पाटील सुमठाणकर, सैनिक फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे, पोलीस निरीक्षक जावेद शेख, काँग्रेस प्रदेश सरचिटणीस डॉ.श्रावण रॅपनवाड, प्रा यशवंत बोडके तालुकाध्यक्ष मराठा सेवा संघ मुखेड, डॉ. राहुल कांबळे, नगरसेवक तथा गटनेते विनोद आडेपवार नगरसेवक बजरंग कल्याणी, शंकर चिंतमवाड, जयप्रकाश कानगुले, पंकज गायकवाड, नितीन पा. कोकाटे तालुकाध्यक्ष संभाजी ब्रिगेड कंधार, किरण पा. बोडके बालाजी पा. ढोसणे, सामाजिक कार्यकर्ते गोविंदराव कदम, उमेश आडलूरकर, प्रदीप पा. हसनाळकर, गिरीधर पा. केरुरकर, नितीन टोकलवाड, व्यंकट पा.गवते, पत्रकार संघाचे अध्यक्ष महेताब शेख, ज्ञानेश्वर डोईजड, असद बलखी, संपादक नामदेव यलकटवार,विमा प्रतिनिधी माधव पा. जुने, विनायक झोडपे, विठल बरसमवाड, विठ्ठल शिरबळतळ,उमेश पा.गोपनर, प्रा.सचिन मेनकुदळे, प्रा.संतोष तळेगावे या सहित तालुक्यातील मोठ्या संख्येने प्रतिष्ठित नागरिक विद्यार्थ्यांचे पालक व महिला तसेच अकॅडमीतील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## राजुरा नागरी सहकारी पतसंस्था तर्फे व्यवसायिक वाहन कर्ज वाटप

**अक्षराज : चंद्रकांत भोयर**
**दि.२८, राजुरा :** राजुरा नागरी सहकारी पतसंस्था शाखा कोरपना तर्फे सभासदांना विविध कर्ज योजनांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य करण्यात येत असून, आज दिनांक २७ मे २०२६ रोजी सभासद वैभव भास्कर जोगी, रा. वनसडी यांना वाहन खरेदीसाठी ८ लाख ५० हजार रुपयांचे वाहन कर्ज वितरित करण्यात आले.

यावेळी पतसंस्थेच्या वतीने त्यांना वाहनाची चाबी प्रदान करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे व्यवस्थापक श्री. बोर्डे उपस्थित होते. राजुरा नागरी सहकारी पतसंस्था ग्रामीण भागातील सभासदांना आर्थिक बळ देण्यासाठी विविध कर्ज योजना राबवत असून वाहन कर्ज, गृहकर्ज तसेच व्यवसाय कर्जाच्या माध्यमातून अनेकांना मदत केली जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

सभासद वैभव जोगी यांनी पतसंस्थेचे आभार मानत या आर्थिक सहाय्यामुळे व्यवसाय व दैनंदिन कामकाजासाठी मोठी मदत होणार असल्याची भावना व्यक्त केली.